**क्र.१६३(२)/२०१९/१४-ब** **दिनांक- ३० जानेवारी, २०२०**

**महाराष्ट्र वन सेवा (मुख्य) परीक्षा-२०१९**
**जाहिरात क्र.१२/२०१९**
**घोषणा**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे दिनांक १५ सप्टेंबर, २०१९ रोजी, घेण्यात आलेल्या महाराष्ट्र वन सेवा, (मुख्य) परीक्षा-२०१९ या परीक्षेचा निकाल **दिनांक ३० जानेवारी, २०२०** रोजी जाहीर करण्यात आला आहे. मुख्य परीक्षेत अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांच्या मुलाखतीचा कार्यक्रम आयोगाच्या www.mpsc.gov.in या संकेतस्थळावर स्वतंत्ररित्या प्रसिध्द करण्यात येईल.

२. **प्रस्तुत मुख्य परीक्षेसाठी उमेदवारांनी ऑनलाईन पध्दतीने केलेल्या अर्जात दिलेल्या माहितीच्या आधारे, त्यांची पात्रता तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून , मुख्य परीक्षेच्या निकालाआधारे मुलाखतीकरिता प्रवेश देण्यात आला आहे. या तपासणीनुसार अपात्र ठरणाऱ्या उमेदवारांची उमेदवारी आयोगाकडून कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल, याची कृपया नोंद घेण्यात यावी.**

३. **मुख्य परीक्षेव्दारे मुलाखतीसाठी अर्हताप्राप्त ठरलेल्यम्या सर्व उमेदवारांनी प्रस्तुत परीक्षेकरिता अधिसुचित केलेल्या पदांसाठी पसंतीक्रम (Preference Number) त्यांच्या Profile मध्ये पाठविलेल्या नमुन्यात (Format) आयोगास Online पध्दतीने Link Open** झाल्यापासून आठ दिवसाच्या आत पाठविणे आवश्यक आहे. अन्यथा अधिसूचनेत ज्या क्रमाने पदे नमूद करण्यात आली आहेत, तोच पसंतीक्रम अशा उमेदवारांकरिता गृहीत धरला जाईल. उक्त उल्लेखित Online पध्दतीखेरिज अन्य कोणत्याही प्रकारे पाठविलेला पसंतीक्रम ग्राह्य धरला जाणार नाही. तसेच याबाबत कोणतीही बाब / निवेदने / पत्रव्यवहार तद्नंतर विचारात घेतली जाणार नाहीत.

४. प्रस्तुत परीक्षेचा निकाल समांतर आरक्षणाच्या मुद्यासंदर्भात तसेच अन्य मुद्यांसंदर्भात विविध मा. न्यायालयात/ मा. न्यायाधिकरणात दाखल करण्यात आलेल्या न्यायिक प्रकरणातील अंतिम न्यायनिर्णयाच्या अधीन राहून जाहीर करण्यात आला आहे.

५. प्रस्तुत परीक्षेत अर्हताप्राप्त न ठरलेल्या ज्या उमेदवारांना त्यांच्या उत्तरपत्रिकेतील गुणांची फेर पडताळणी करावयाची आहे, अशा उमेदवारांनी गुणपत्रके प्रोफाईलमध्ये पाठविण्याच्या दिनांकापासून १० दिवसात आयोगाकडे ऑनलाईल पध्दतीने विहित नमुन्यात अर्ज करणे आवश्यक राहील. (आयोगाच्या संकेतस्थळावरील सर्वसाधारण सूचनेतील सूचना क्र .३.८ कृपया पहावी.)

**ठिकाण- मुंबई**

**उपसचिव, परीक्षा-१**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई**